काळा स्वातंत्र्यदिन

राजा ढाले

१

पडघाळ्याच्या काठावर चालणाऱ्या अजस्र पण सुस्त मुंबईत काही घटना, घडामोडी घडताहेत। खरं म्हणजे मुंबईची घडी-मोड होत आहे। उदाहरणार्थ, धरणे, मोर्चे, घेराव वगैरे मार्गांनी विद्यार्थ्यांची चळवळ रस्त्यावर येऊन जोर धरत आहे। विद्यार्थ्यांचा उद्रेक रूप घेत आहे। स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सवी उत्सव काळा दिवस पाळण्याचे ठरत आहे। मुंबई ही महाराष्ट्राची आणि भारताचे हृदय आणि मेंदू आहे। म्हणून महाराष्ट्रात बौद्धांवर आणि हरिजन-गिरिजनांवर झालेल्या अन्यायाचा पहिला पडसाद मुंबईरूपी हृदयात उमटला। तिथे ठोके चुकले...उलट गुलट झाले. मुंबईचे ठोके चुकले म्हणजे सबंध मुंबई जागी झा ी नाही। युवकांनी जाग आणायचं कार्य केलं। आणि मुंबईच्या सांस्कृतिक जीवनात : मुंबईरूपी हृदयात जे कप्पे-चोरकप्पे आहेत त्यांपैकी, दलित साहित्यिक हा कप्पा प्रथम जागा झाला। दरम्यान बं. कांबळे यांचेही पत्रक निघाले। त्यानंतर युवक आघाडी स्थापन झाली। मुख्यमंत्र्यांच्या निवासावर धरणे धरले। लगेच युक्रांद जागी झाली। मनुस्मृती जाळली आणि ती गट युवक आघाडीला मिळाला। 'त्यांच्याबरोबर बहुसंख्येने वावरणारा जागा। तसेच समाजवादी युवक सभा, राष्ट्र सेवा दल यांचे प्रतिनिधी सामील झाले। नंतर मग ज्यांना हृदय व मेंदू आहे ते कवी आणि विद्यार्थी कार्यकर्ते जागे होऊन आणि सर्व डाव्या संघटनांतील तरुणांच्या उपसंघटना जाग्या होऊन विद्यार्थी संघर्ष समिती स्थापण्यात आली। मुंबई गर्जू लागली। बोलू लागली। आग ओकू लागली। कारण दरम्यान विधान सभेत गवळे-मोरे या बौद्ध तरुणांनी आग ओकली। मी म्हणेन, सोलापूर गर्जत असेल तर मुंबई आग धगत आहे। ओकत आहे।

२

दरम्यान प्रा. सदा कऱ्हाडे यांची– एका स्पृश्याची डायरी, बाजारात आली। या कादंबरीत ब्राह्मण कसे अस्पृश्य ठरतात ते आर्थिक तत्त्वावर भर देऊन दाखवलंय। म्हणजे धनवान ब्राह्मण गरीब ब्राह्मणांना अस्पृश्यांप्रमाणे वागणूक देतात! कादंबरी सामान्य व एकसुरी व भडक आहे; पण प्रतिपाद्य विषयातून हे सिद्ध होतं की, ब्राह्मण गटाचं आर्थिक तत्त्वावर दोन गटांत विभाजन झालंय। एक स्पृश्य : श्रीमंत ब्राह्मण। एक अस्पृश्य : गरीब ब्राह्मण। मी असं म्हणेन की, आजच्या मराठा समाजातही आर्थिक तत्त्वावर हे दोन म्हणजे स्पृश्य–अस्पृश्य आहेत। आणि तसेच वैश्य व शूद्र वर्णांतही ते कमीअधिक प्रमाणात अनुस्यूत आहेत। पण ब्राह्मणगाव किंवा बावडा प्रकरणी बौद्धांवर झालेल्या अन्यायात मुंबईतल्या त्याच लोकांची वस्ती असलेल्या, लेबर कॅम्पमधल्या दोन बौद्ध युवकांनीच प्रथम विधान सभेत आग का ओकली नि इतरांनी का नाही? याचं उत्तर, ज्याचं जळतं त्याला कळतं। इतरांना याची आच लागतच नाही, म्हणून हे गप्प। नाही तर स्पृश्यांतल्या आर्थिक अस्पृश्यांनी याविरुद्ध आवाज उठवला असता– का उठवला नाही? कारण आर्थिक स्तरांनी जरी हे एका पातळीवर असले तरी सामाजिक म्हणजेच जातीय पातळीवर हे उंच आहेत। प्रत्येक स्तरातल्या, वर्णातल्या आर्थिक अस्पृश्याला जातीय चौकट आडवी आली। म्हणून ती प्रथम मोडून टाकली पाहिजे। वरच्या स्तरातील अस्पृश्य आणि आम्ही एकाच पातळीवर असताना सामाजिक अर्थानं अस्पृश्य असणाऱ्यांविरुद्धच्या अत्याचाराविरुद्ध हे मुस्कटातील का बोंबलले नाहीत? यांना फक्त आर्थिक समता हवी आहे। सामाजिक नको,– असाच याचा अर्थ नाही काय? म्हणजेच परदुःख शीतल! मराठीतले ललित साहित्यिक नि विचारवंत सखाराम बाइंडरच्या बाजूने बोंबा मारतात, पत्रकं काढतात। बौद्धांवरील अन्यायाबाबत हे का गप्प बसतात?– की, चाललंय ते यांना मंजूर आहे! वेश्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून द्या। कारण ती समाजाची गरज भागवते, असं म्हणणाऱ्या भागवत बाईंना वेश्यांना वेश्याच ठेवायचं आहे– हा यांचा 'पतितोद्धार'! ज्यांना असं वाटतं त्यांनी स्वतः धंदा का करू नये? तर अशी ही माणसं, आपमतलबी। मुंबईत मिश्र वस्ती असून विचारानं जातीजातीत विभागलेली। कारण माटुंगा लेबर कॅम्पमधले गवळे–मोरे फक्त बौद्धांवरील अत्याचारानं पेटतात। हे का पेटत नाहीत। हे आमचे भाईबंद नाहीत। देशबंधू नाहीत। आम्ही परके आहोत का? मग का वेगळं राष्ट्र मागू नये। आणि मुंबईत मिश्र वस्ती तर कितपत प्रमाणात कुठं आहे? भेंडी बाजार, माहिम, वांद्रे वगैरे मुस्लिम वस्त्या सोडल्यास गिरगाव, दादर, डोंबिवली, ठाणे, विलेपार्ले इथं बहुसंख्याक कोणाची वस्ती आहे? आणि नायगाव, वरळी, डिलाइल रोड, भायखळा, बॉम्बे सेंट्रलचा काही भाग इथं बहुसंख्याक कोण आहेत? – याच मिश्र वस्त्या का? मुंबईत जातीयता आहे ती अशी। आणि गिरगावातल्या आंतरजातीय प्रेमावर मृत्यू हाच तोडगा ठरतो हेच उघाडे प्रकरणी सिद्ध होतं। हा जातीय सलोखा का?

३

हे सर्व प्रश्न आजच्या तरुण मनाला पडले आहेत : पडले आहेत; म्हणून तर सर्व जातीधर्मांचे तरुण संघर्ष समिती बांधतात, नि गवळे–मोरे यांना सोडा म्हणून मोर्चा काढतात। आकाशपाताळ एक करतात। जातिनिर्मूलन युवक परिषदेला हजारोनं जमतात। गवळे-मोरे यांचा सत्कार करतात. पर्यायाने स्वातंत्र्यदिन काळा दिन पाळायचा घाट घालतात.

खरं तर स्वातंत्र्य मिळून २५ वर्षं झाली असं म्हटलं जातं; पण या प्रजासत्ताक राज्यात आम्हांला : प्रजेला : सर्वसामान्य लोकांना स्वातंत्र्य कुठाय? ब्रिटिश राजवटीत आमच्यावर जसे लाठीहल्ले होत होते तसेच स्वराज्यातही ब्रिटिश लोकांनंतर होत आहेत। याचा अर्थ ब्रिटिश राजवट गेली तरी ब्रिटिश करायचे तेच अत्याचार लोकशाही यंत्रणा करत आहे। मग अजूनही ब्रिटिशांचं राज्य

केली असेल तर पृथ्वीवर हे क्षत्रिय आले कुठून? बरं, शिवाजीला मराठा म्हणावा तर त्याची मूळं राजस्थानात शिसोदे वंशात, अथवा कर्नाटकातल्या होयसाळ वंशात। मग हा मराठा कसा? त्याला मराठा म्हणायचं तर मग बाकीचे मराठे उपरे ठरतात किंवा शिवाजी उपरा ठरतो। बरं, महाराष्ट्रात आला म्हणून मराठा म्हणावं तर तो मूळ मराठा नाही। म्हणजे क्षत्रिय मराठे नव्हेत। मराठे मराठे नव्हेत। मग मराठपणाचं मूळ कोणतं? की तो आमच्यातलाच एक वर्ग आहे? तिसरं म्हणजे, बीजज पुत्र आणि क्षेत्रज पुत्र;–हे आर्यांचं लफडं। आपल्या क्षेत्रात जन्मला: आपल्या स्त्रीपोटी जन्मला म्हणून क्षेत्रज पुत्र, पण आपल्या बीजापासून न जन्मलेला अनौरस: म्हणजे क्षेत्रीय: क्षत्रिय। तर या तीनपैकी मराठे कुठले व का याचा जाब त्यांनी द्यावा, नि मग जातिरचनेत राहून इतरांवर अन्याय करावा नपेक्षा आपल्या आयाबहिणी ओळखाव्या हे उत्तम।

जातीय संस्थेचा अंगीकार करताना आपण कुठल्या जातीत असतो नि कुणावर व का अन्याय करावा हे कळत नाही त्यांचा अन्याय आंधळा आहे: रुढिगत आहे हे या नरपशूंना कळत नाही का? म्हणून चातुर्वर्ण्य तोडला पाहिजे। मुळापासून उखडलाच पाहिजे। गीता बहिष्कृत केली पाहिजे: हिंदू धर्म नेस्तनाबूत केला पाहिजे।

६

बरं म्हणजे, महात्मा फुले यांच्यानंतर या देशात सुधारक झाले नि स्वातंत्र्यवीर झाले, पण फुल्यांना जे क्रांतिकारकत्व देता येतं ते यांना देता येत नाही। फुल्यांनी हिंदू धर्माच्या सडेल रोगावर अचूक हात ठेवला, तर तिकडे दुर्लक्ष करून ही सुजी माणसं गीतारहस्य लिहीत बसली। तर सुधारकांनी सकच्छ की विकच्छ यावर वाद माजवला। बाल-विवाहांना प्रतिबंध व विधवा विवाहांना मान्यता यासाठी लढले। फुले यांच्या आधीचे असून हे अस्पृश्यतेविरुद्ध त्यांच्याप्रमाणे का लढले नाहीत हा महत्त्वाचा प्रश्न आहे। त्यांनी विशेषतः आगरकरांनी स्त्रीला जरूर धक्का दिला। पण त्या सुधारणा एक तर आमच्यासाठी नव्हत्या, किंवा त्यांची चक्रं सतत प्रगतीच्या दिशेनं फिरून आमच्यापर्यंत आल्या नाहीत,– कारण चातुर्वर्ण्य व्यवस्था। आज पण जनावरांपेक्षा हीन वागणूक आम्हांला मिळते याचाच अर्थ एक तर आमच्यात किंवा स्पृश्य वर्गात तरी सुधारणा नाही। दुसरं म्हणजे, आपले मुख्यमंत्री काल परवा आवाहनकर्ते झाले की, लोकमान्यांच्याच निर्धाराने सामाजिक समतेसाठी लढून एकात्मता प्रस्थापित करू या। लोकमान्यांनी सामाजिक समतेसाठी निर्धाराने कधी लढा दिला? उलट वेदोक्त प्रकरणात ते म्हणाले की, शिवाजीच्या काळच्या मराठ्यांपेक्षा आजच्या मराठ्यांना जास्त हक्क मागायचा काय अधिकार आहे? हीच सामाजिक समता की तिच्या विरुद्धचं उदाहरण? तर त्यांना स्वराज्य हवं होतं: पण समता नको होती। म्हणून तर स्वातंत्र्य चळवळीत अर्धवट शिकलेले गुंड कोणत्याही गुन्ह्याखाली आत गेले नि स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्यसैनिक म्हणून बाहेर आले। त्यांची बौद्धिक कुवत ती देशाची बौद्धिक पातळी। त्या लोकांनी राज्य चालवायचं। मंत्रिपदं भोगायची तर त्यांच्या हाताखाली विद्वानांनी राबायचं। हुकूम पाळायचे। हीच लोकशाही। अशा धामधुमीत २५ वर्षं निघून गेली। ना आगरकरांची सुधारणा आम्हांला सुधारून गेली: ना टिळकांचं स्वराज्य आम्हांला स्वातंत्र्य देऊन गेलं: आम्ही आंबेडकरांच्या मागे जाऊन सुधारलो तर हे लोकच आम्हांवर बहिष्कार टाकून, आमच्या बायकांची अब्रू लुटतात। एकूण आम्ही सुधारू नये ही यांची इच्छा। आणि आम्ही सुधारणार, हा सबंध समाज बदलणार हे आमचं ध्येयवाक्य। आमच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे लोक: त्यांना सांगू की तुम्ही पण स्वतंत्र नाही; कारण तुम्ही मोर्चा काढाल तरी दंडुके बसणार। हे सरकार आपलं नाही। ब्रिटिश गेले पण ब्रिटिशांची प्रवृत्ती राज्यकर्त्यांत जिवंत आहे; म्हणून आपण स्वतंत्र आहोत हे चूक। स्वतंत्र ते आहेत– जे आपणाला गुलामासारखं वागवतात। मग गुलामीत स्वातंत्र्य कसलं?

■ ■

माझ्या लहान बहिणीचे उपकार कसे फेडू?

भीमराव चिकटे

गरीबी ही आपल्या पाचवीलाच पुजली आहे. तशात मी एस्. एस्. सी. पास झालो. आईवडिलांचा आनंद गगनात मावेना. परंतु कमळ ज्याप्रमाणे पाण्यापासून अलग राहते, त्याप्रमाणे सुख किंवा आनंद आपणा गरीबांपासून अलग राहतो. आता प्रश्न,– पुढील शिक्षण कसे करावयाचे? मी आठवीच्या वर्गात शिकत असतानाच आपल्या मिलिंद कॉलेजविषयी ऐकले होते. हे कॉलेज बाबासाहेबांनी स्थापन केलेले. त्यामुळे माझा दृढ निश्चय की, औरंगाबादलाच बाबांच्या कॉलेजमध्ये जावयाचे. परंतु परिस्थिती साथ देत नव्हती. कपडे नव्हते, प्रवासासाठी पैसे नव्हते, परंतु माझा मात्र खंबीर विचार की, तिकिटाशिवाय का होईना, परंतु मिलिंद कॉलेजलाच जायचे

त्याप्रमाणे औरंगाबादला येण्याची पूर्वतयारी सुरू झाली. माझी एक छोटीशी प्रेमळशी बहीण आहे. ती सध्या पाचवीत शिकत आहे. तिने मला अंधारातून कॉलेज जीवनाकडे जाण्यासाठी कंदिलाचा आधार दिला. आणि मला बाबांच्या ज्ञानरूपी–प्रकाशरूपी कॉलेजचे दर्शन घडवले. ते कसे?

तर ही माझी छोटी बहीण, आई व आपल्या इतर दलित आई-बहिणी एका श्रीमंताच्या येथे शेंगांचे बी फोडण्यासाठी जात असत. त्या वेळी माझी छोटी बहीण दररोज खिशात एक चिपटे (½ शेर) भरून घरी आणी, व साठा करी. याप्रमाणे परिस्थितीने साथ दिली. छोट्या बहिणीने दीड पायली बी गोळा केले. ते बी बाजारात विकण्यात आले. त्याची बारा रुपये किंमत झाली. त्या बारा रुपयांचे मला साधारण कपडे करण्यात आले. याप्रमाणे कपड्यांचा प्रश्न मिटला. त्याचप्रमाणे एका सावकार पाटलाकडे भांडे देऊन प्रवासासाठी पैसे आणले.

याप्रमाणे मिलिंद कॉलेजचा मार्ग धरला आणि एकदाचे रंगमंदिरासमोर असलेल्या बाबांचे दर्शन घडले. हे माझे सुदैव समजतो पण माझ्या छोट्या बहिणीचे उपकार कसे फेडू?

■ ■